स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Details of Written on the CD

1. Title of the research	:	**भारताची सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यत्वाची मागणी आणि आंतरराष्ट्रीय राजकारण : एक चिकित्सक अभ्यास**
2. Name of the Researcher	:	Kounsalye Sangram Gopinath
3. Name of the Guide	:	Dr. Madhav Kadam
4. Subject	:	Political Science
5. Date of Registration	:	07.07.2021
6. Date of Submission	:	August 2024
7. Mobile No.	:	9923243461
8. Synopsis CD	:	Synopsis CD
9. E-mail	:	sangramgkounsalye@gmail.com
10. No. of Pages	:	

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयात पीएच.डी.पदवीच्या नोंदणीसाठी

सादर करावयाचा

नियोजित संशोधन प्रकल्प आराखडा.

भारताची सुरक्षा परिषेदतील स्थायी सदस्यत्वाची मागणी आणि आंतरराष्ट्रीय राजकारण : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक
कौंसल्ये संग्राम गोपीनाथ
राज्यशास्त्र विभाग,
श्री शिवाजी ज्यु.कॉलेज,कंधार
मो.९९२३२४३४६१
Email Id : sangramgkounsalye@gmail.com

मार्गदर्शक
प्रा.डॉ.माधव कदम
विभाग प्रमुख,
राज्यशास्त्र विभाग,
श्री शिवाजी कॉलेज कंधार
मो.९७६६५५७७५८
Email Id : kadammadhav९६९@gmail.com

प्रस्तावना

विनाशकारी दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक शांतता व स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्राची स्थापना केली गेली. भविष्यात मानवाला आशा जागतिक महायुध्दापासून निर्धोक करणे ही संयुक्त राष्ट्राची भुमिका निश्चित केलेली होती. एकमेकाप्रती सहकार्य भावना वाढीस लावणे हा देखील संयुक्त राष्ट्रांचा उद्देश होता. जागतिक प्रश्न शांततेच्या चर्चेच्या व सलोख्याच्या मार्गाने सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ अस्तित्वात आला.

सुरक्षा परिषद ही संयुक्त राष्ट्राची महत्वपुर्ण शाखा आहे. जागतिक शांतता व स्थैर्य प्रस्थापित करणे ही सुरक्षा परिषदेची जबाबदारी आहे. महासभेला संयुक्त राष्ट्राचे विधीमंडळ म्हणतात तर सुरक्षा परिषद ही संयुक्त राष्ट्रसंघाची कार्यकारी शाखा (Executive Branch) आहे. महासभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे कार्य सुरक्षा परिषदेला कार्य करावे लागते. संयुक्त राष्ट्राच्या इतर समित्यापेक्षा सुरक्षा परिषद ही अतिश्य अधिकार संपन्न आढळून येते म्हणून या परिषदेचे महत्व अन्यन्य साधारण स्वरुपाचे आढळून येते.

सुरक्षा परिषदेला संयुक्त राष्ट्रसंघाचे ऱ्हदय किंवा आत्मा म्हणून देखील ओळखले जाते. कारण संपूर्ण संयुक्त राष्ट्राचे संचलन आणि नियंत्रण सुरक्षा परिषदेमार्फतच केले जाते आणि यामुळेच सुरक्षा परिषदेला संयुक्त राष्ट्रात शिर्ष स्थान देण्यात आलेले आहे. एका आर्थाने संपूर्ण जगावरच सुरक्षा परिषदेचे निमंत्रण असते म्हणून आंतरराष्ट्रीय संबंधाचे विश्लेषण <u>डेविड कुशेमन</u> सुरक्षा परिषदेला जगाचा घ<u>पोलीसमन</u>ङ असे म्हणतात.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेतील प्रकरण पाच मधील कलम २३ ते ५० मध्ये सुरक्षा परिषदेच्या रचनेचा व कार्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सुरक्षा परिषदेत प्रामुख्याने दोन प्रकारचे सदस्य आढळून येतात. एक कायम (स्थायी) सदस्य तर दुसरे हंगामी अस्थायी स्वरुपाचे सदस्य,कायम सदस्य संख्या पाच आहे तर अस्थायी सदस्य संख्या १९६० च्या

दशकात सहावरुन दहा करण्यात आली असे एकूण पंधरा सदस्य संख्या असते. अस्थायी सदस्याची निवड दोन वर्षासाठी करण्यात येते. पंधरा सदस्यापैकी पाच सदस्याकडेच नकाराधिकार (Veto) असतो आणि हाच नकाराधिकार जागतिक असंतोषाचे कारण बनलेला आहे. मुळात सुरक्षा परिषद जागतिक शांतता व सहकार्य वाढीस लावण्यासाठी अस्तित्वात आलेली आहे. मात्र नकाराधिकार प्राप्त सदस्यांच्या अंतर्गत वादामुळेच जागतिक असंतोषाचे मुळ बनलेली आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर जग दोन महासत्तांच्या विळख्यात सापडले हा काळ आंतरराष्ट्रीय राजकारणात <u>शितयुध्दाचा</u> काळ म्हणून ओळखला जातो. याच काळात संयुक्त राष्ट्राची स्थापना झाली. अमेरिका आणि रशिया या दोन महासत्ताचा सुरक्षा परिषदेत सहभाग असल्या कारणाने अनेक जागतिक प्रश्न सोडवण्या ऐवजी ते अधिकच जटील बनलेले दिसून येतात.

सुरक्षा परिषदेची पुनर्रचना करण्यात यावी यासाठी अनेक वेळा जागतिक पातळीवर आवाज उठवला जातो. आज अनेक राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वासाठी दावा करतांना आढळून येतात. यामध्ये भारताचा देखील समावेश होतो. भारताची संयुक्त राष्ट्रावर असलेली श्रध्दा आणि संयुक्त राष्ट्राच्या भुमिकेला पुरक असे भारतीय परराष्ट्र धोरण हे एक महत्वपुर्ण कारण मानले जाते.

बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार सुरक्षा परिषदेचे <u>लोकशाहीकरण</u> व्हावे. तसेच मुठभर राष्ट्राच्या मक्तेदारीतून ही संघटना मुक्त व्हावी सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यत्वासाठी इच्छुक आणि पात्र राष्ट्रांना स्थायी सदस्यत्व प्रदान करण्यात यावे अशा प्रकारची मागणी आंतरराष्ट्रीय स्तरावर जोर धरत आहे.

सुरक्षा परिषदेला निपक्ष आणि प्रभावीपणे कार्य करण्यासाठी सुरक्षा परिषदेचा विस्तार होणे आवश्यक आहे. परराष्ट्र आणि संरक्षण धोरण विश्लेषक ब्रम्ह चेलानीच्या मते With

the UN danger of getting marginalised in International relations, it has become inperative to make the security councial more representational democratic and accountable.

विश्वातील अनेक राष्ट्र भौगोलिक,सामाजिक,आर्थिक,राजकीय दृष्टया सक्षम असून त्यांनी आपले अस्तित्व सिध्द केलेले आहे. तसेच ते जगाचे प्रभावी केंद्र बनत चाललेले आहेत. त्यांना स्थायी सदस्यत्वापासून वंचीत ठेवणे योग्य होणार नाही. म्हणून संयुक्त राष्ट्राचे पूर्व सचिव डॅम होमर शोल्ड यांनी असा इशारा दिला आहे की, संयुक्त राष्ट्रसंघटनेने राष्ट्रसंघाच्या चुकांची पुनरावृत्ती न करता संयुक्त राष्ट्रसंघाचे लोकशाहीकरण करावे, नाहीतर विश्वातील सर्वात मोठया संयुक्त राष्ट्र संघाचे भवितव्य तेच असेल जे राष्ट्रसंघाचे झालेले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासूनच आजतागायत संयुक्त राष्ट्र संघाची सदस्य संख्या अनेक पटीने वाढलेली आहे. आज १९३ राष्ट्र सभासद असून केवळ पाचच राष्ट्राकडे सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व आहे.

वर्तमान काळात नव्याने सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वासाठी भारताबरोबरच जपान, जर्मनी,ब्राझील,द.आफ्रिका,नायजेरिया इ.देशांनी आपला दावा सांगितलेला आहे. भारत, जर्मनी,जपान,ब्राझील या देशांनी आपला आवाज अधिक बुलंद करण्यासाठी G-४ या संघटनेची स्थापना केलेली आहे. L-६९ ही संघटना भारत आशिया आफ्रिका आणि लॅटीन अमेरिका यातील ४२ देश प्रतिनिधित्व करतात. आफ्रिकी समुह-५४ देश सहभागी आहेत. सुरक्षा परिषदेत सुधारणेची मागणी करणारा हा एक महत्वाचा गट म्हणून ओळखला जातो. यांच्या मते आफ्रिकेतील किमान दोन राष्ट्रांना सुरक्षा परिषदेत स्थायी प्रतिनिधीत्व मिळाले पाहिजे.

परंतू सुरक्षा परिषदेत कायम सदस्य असलेल्या देशांची मानसिकता सुरक्षा परिषदेची सदस्य संख्या वाढवण्याची किंवा पुनर्रचना करण्याची नाही. यामुळे त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणून सुरक्षा परिषदेच्या विस्ताराला पायबंद घातलेला आहे. यातून बडया राष्ट्राचा दुटप्पीपना पुढे येतो. संयुक्त राष्ट्राचे पुर्वसचिव बुट्रोस घली यांनी असे म्हटले आहे की, जोपर्यंत संयुक्त राष्ट्रावरील बडया राष्ट्रांचा दबदबा व युरोपकेंद्रोत मानसिकता समाप्त होणार नाही. तोपर्यंत विश्वातील लहान राष्ट्रांचे कल्याण होणार नाही.

_____सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्वासाठी भारताने आपली दावेदारी १९९४ मध्ये घोषीत केली. भारताच्या दावेदारीचा आधार होता. भारताचे क्षेत्रफळ दक्षिण आशियातील आणि भारतीय उपखंडातील भारताचे स्थान तसेच जगातील सर्वात मोठी लोकशाही शासन पध्दती असलेला देश आणि तीचे यशस्वीपणे संचलन करणे. जगात दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या (१३७ कोटी) असलेला देश आहे. जगाच्या १७% लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व भारत करतो. हिंदी महासागरातील सामारिक दृष्टया महत्वाचे स्थान. जगातील सहाव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असलेला देश आहे. (५ ट्रिलियन डॉलर)

भारत हा संयुक्त राष्ट्र संघटनेचा संस्थापक सदस्यापैकी एक देश आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेवर आपार विश्वास आणि श्रध्दा असलेला देश आहे. मुळात भारताच्या परराष्ट्र धोरणाचा कल देखील विश्वशांती निर्माण करण्याकडेच असतो. भारताची सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यत्वाची दावेदारी संयुक्त राष्ट्रासाठी दिलेले योगदानाला न्याय देणारी आहे.

भारताच्या योगदाना विषयी शशी थरुर म्हणतात India is leading donor to the united nations Democracy fund. Which provides assistance for bulding democracy, India has established a peace building commission to help countries transition for war to durable peace.

भारताने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पाच क्षेत्रामध्ये योगदान दिले आहे.

अ) निर्वसाहती करणाच्या प्रक्रियेत

ब) मानवाधिकाराच्या संरक्षणात

क) निशस्त्रीकरणच्या प्रक्रियेत

ड) वंशवादाच्या निर्मुलनासाठी

इ) संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतीसैनिक मोहीमामध्ये ५० हजार सैनिकांनी तीसहून अधिक मोहीमामध्ये भाग घेतला. भारताचे हे योगदान इतर दावेदारापेक्षा निश्चित श्रेष्ठ आहे.

संशोधनातील समस्या

भारत हा संयुक्त राष्ट्रसंघाचा संस्थापक सदस्य आहे. तसेच संयुक्त राष्ट्रावर अपार श्रध्दा आणि विश्वास असलेला देश आहे. अनेक जागतिक प्रश्न शांतता व सलोख्याच्या मार्गाने संयुक्त राष्ट्राच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करत असतो. दक्षीण आशियातील आणि भारतीय उपखंडातील भारताचे स्थान महत्वपुर्ण आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाची (१३७ कोटी) लोकसंख्या असलेला आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही शासन व्यवस्था असलेला देश आहे. विश्वातील सहावी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेला देश आहे. असे अनेक प्रबळ समर्थनार्थ मुद्दे असतांना देखील भारताला संयुक्त राष्ट्रामध्ये स्थायी सदस्यत्व का मिळत नाही या समस्येचा शोध घेणे या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

अभ्यासाचे महत्व (Important of Study)

संशोधनाचे महत्व पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट होईल.

१) विश्वशांती आणि विकासात्मक कार्यामध्ये भारतीय योगदानाचे ज्ञान अवगत होईल.

२) बदलत्या परिस्थितीत सुरक्षा परिषदेत रचनात्मक आणि कार्यात्मक बदल करणे का आवश्यक आहे याचे अकलन होईल.

३) सुरक्षा परिषदेच्या लोकशाही करणाची वास्तविकता समजेल.

४) सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्व मिळवतांना येणाऱ्या अडचणी व आव्हाने समजतील.

५) सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्वासाठी केल्या जाणाऱ्या दाव्याचा व समर्थनार्थ मांडल्या जाणाऱ्या तर्काचे अकलन होईल.

उदिद्ष्टये (Objective of Research)

१) सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व आणि भारताची भुमिका यांचे अध्यायन करणे.

२) सुरक्षा परिषदेतील भारताच्या स्थायी सदस्यत्वाच्या मागणीचा अभ्यास करणे.

३) सुरक्षा परिषदेतील भारताच्या स्थायी सदस्यत्वा बाबतच्या प्रबळ दाव्यांचा शोध घेणे.

४) सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्व मिळवण्यासाठी येत असलेल्या अडथळयांचा व आव्हाणांचा शोध घेणे.

५) भारताचे सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यत्व आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करणे.

गृहितके (Hypothesis)

१) संयुक्त राष्ट्रामधील भारताची भुमिका सहकार्याची व सकारात्मक राहिली आहे.

२) भारताची सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यत्वाची मागणी विधायक स्वरुपाची आहे.

३) सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यत्वासाठी भारत एक प्रबळ दावेदार राष्ट्र आहे.

४) सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी भारतासमोर अनेक आव्हाने/ अडथळे आहेत.

५) सुरक्षा परिषदेच्या लोकशाही करणाची आणि विस्ताराची आवश्यकता आहे.

संशोधन पध्दती (Research Method)

प्रस्तुत संशोधन विषयासाठी ऐतिहासिक तथ्यांचे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा आवलंब करुन निष्कर्षापर्यंत पोहचणे त्यासाठी प्रकाशीत व मान्यता प्राप्त व्दितीय स्त्रोतांचा अवलंब करण्यात येईल. त्यामध्ये प्रकाशीत ग्रंथ, शोधपत्रिका, प्रकाशित शासकीय दस्ताऐवज,वर्तमानपत्रे,मासिके इत्यादींचा समावेश करण्यात येईल.

संशोधन आराखडा (Research Design)

प्रकरण पहिले : प्रस्तावना.

प्रकरण दुसरे : संयुक्त राष्ट्र संघाची रचना.

प्रकरण तिसरे : सुरक्षा परिषदेची रचना व कार्य.

प्रकरण चौथे : सुरक्षा परिषदेत भारताची स्थायी सदस्यत्वाची मागणी/दावेदारी.

प्रकरण पाचवे :भारताची स्थायी सदस्यत्वाची मागणी आणि आंतरराष्ट्रीय राजकारण.

प्रकरण सहावे : समारोप आणि निष्कर्ष.

संदर्भग्रंथ सुची :-

१. डॉ.शैलेंद्र देवळणकर - संयुक्त राष्ट्रे : प्रतिमा प्रकाशन पुणे - पृष्ठ क्रं.२३५

२. डॉ.डि.एल.भाटिया - आंतरराष्ट्रीय राजणीती : आग्रा साहित्यभवन प्रकाशन-पृष्ठ क्रं.१६२

३. डॉ.शैलेंद्र देवळणकर - भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्त्रित्यांतरे : प्रतिमा प्रकाशन पुणे - पृष्ठ ३६९.

४. क्रॉनिकल संपादक एन.ओझा भारत एंव विश्व आंतरराष्ट्रीय मुद्दे एवं आंतरराष्ट्रीय संस्था : नवी दिल्ली संस्कारण २००७ - पृष्ठ ८३

५. प्रतियोगीता दर्पण (मासिक) आग्रा,स्वदेशी बीमा नगर संस्कारण २००५-पृष्ठ क्रं.७७.

६. डॉ.शैलेंद देवळणकर - भारतीय परराष्ट्र धोरण : प्रतिमा प्रकाशन पुणे-पृष्ठ क्रं.३७७.

७. अ.भा.धर्माधिकारी (संपादक) चाणक्य मंडळ स्पर्धा परिक्षा विशेषांक अंक सातवा आवृत्ती नोंव्हेबर २००४ - पृष्ठ क्रं.२३.

संशोधक

कौंसल्ये संग्राम गोपीनाथ
कनिष्ठ प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
श्री शिवाजी ज्यु.कॉलेज,कंधार

मार्गदर्शक

प्रा.डॉ.माधव कदम
विभाग प्रमुख,
राज्यशास्त्र विभाग,
श्री शिवाजी ज्यु.कॉलेज,कंधार